निशाणी क्र.२२ वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ यांनी दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ०७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे.

**२.** निशाणी क्रं. २२ व्दारे प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ यांचे थोडक्यात कथन की, वादीने कसबे अंबड ता. अंबड जि. जालना येथील सर्व्हे नंबर ४५४/१ क्षेत्रफळ ०९ हेक्टर ६१ आर आकार २८ रुपये ३० पैसे यामधील प्रतिवादी क्रमांक १ ते २ यांच्या नावावरील क्षेत्र २ हेक्टर २२ आर जमीन प्रतिवादी यांनी विक्री, दान, गहाण, तारण किंवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करु नये असा कायम मनाई हुकूम मिळणे बाबत दावा दाखल केलेला आहे जो प्रलंबीत आहे. सदर दावा बेकायदेशीर असुन कायदयाने मेंन्टेनेबल नाही. वादीस दावा दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. सदर वादी यांनी प्रतिवादी क्रमांक ०१ व २ यांच्या विरुध्द करार पुर्तीचा दावा दाखल करणे आवश्यक होते. प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ यांचा सदर कराराशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे सदरचा दावा खारीज होणे न्याय व आवश्यक आहे. सदर दावा दाखल करण्यास कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. दावा दाखल करण्यास कारण न घडल्यामुळे वादीचा दावा खारीज होणे न्याय व आवश्यक आहे. सदरचा दावा हा केवळ वादग्रस्त मिळकत विक्री करता येवु नये या हेतुने दाखल केला आहे. त्यामुळे

सदरचा दावा खारीज करण्याचा आदेश व्हावा. सदर अर्जासोबत प्रतिवादी यांनी शपथपत्र दाखल केले आहे.

**३.** सदर अर्जावर वादी यांनी निशाणी क्रमांक ३६ प्रमाणे म्हणणे दाखल केले आहे. त्यानुसार वादी यांनी निशाणी क्रमांक २२ वरील प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ यांनी दाखल केलेल्या अर्जातील मजकुर खोटा असल्याचे नमुद केले असुन मजकुर नाकारला आहे. वादीने करारपुर्तीचा दावा दाखल करणे न्याय व आवश्यक होते, हे प्रतिवादीचे म्हणणे चुकीचे असुन न्यायालयाकडुन कोणता रिलीफ मागावा हा वादीचा अधिकार आहे असे वादी यांनी म्हटले आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ हे दाव्यात आवश्यक व योग्य पक्षकार आहेत असे वादी यांनी म्हटले आहे. सदर दाव्यास दाखल करण्यास कारण घडले आहे व ते दाव्यात नमुद केले आहे. सदरचा दावा हा प्रलंबीत ठेवण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांनी सदरचा कलम ७ रुल ११ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे दावा हा कायदेशीर आहे त्यामुळे सदरचा प्रतिवादी यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**४.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी सदर अर्जाच्या पृठयर्थ खालील सायटेशन दाखल केले आहेत.

i) मा. सर्वोच्च न्यायालय यांचे CIVIL APPEAL NO. 951/2019 DAHIBEN V/S. ARVINDBHAI KALYANJI

BHANUSALI & ORS.

ii) CIVIL APPEAL NO. 4841/2012 The Church of Crist Charitable Trust & Educational Charitable Society, represented by its Chairman vs. M/s. Ponniamman Educational Trust represented by its Chairperson/ Managing Trustee

iii) Civil Revision Application No. 116/2019 Chetana Shannkar Manapure and ors. Vs. Bandu s/o. Tanaji Barapatre

सदरचा न्यायनिर्णय हा मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांनी दिला आहे. उपरोक्त तीन न्यायनिर्णय प्रतिवादी यांनी दाखल केले आहेत त्यांचे अवलोकन केले.

५. सदर अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखावरील दस्तऐवज पाहीले असता असे दिसुन येते की, वादी यांनी सदर दावा दाखल करण्यास कारण घडले आहे असे नमुद केले आहे. दाव्यास कारण हे दाव्यातील पॅरा नंबर ७ मध्ये नमुद केले असल्याचे दिसुन येते. तसेच वादी यांनी सदर अर्जातील से निशाणी क्रमांक ३६ मध्ये असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ हे या दाव्यातील

नेसेसरी व प्रॉपर पार्टीज असल्याने त्यांना या दाव्यात पक्षकार करणे योग्य व आवश्यक आहे. तसेच दाव्यातील परिच्छेद क्रमांक ६ मध्ये प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ हे दिनांक २७/६/२०१७ रोजीच्या प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या सोबतच्या ताब्यासह इसार पावतीचा गैरफायदा घेवुन वादग्रस्त मिळकत हस्तांतरीत करण्याची शक्यता असल्याने तसेच त्यांनी काही भुखंड खरेदी केलेले आहेत व परत खरेदी करण्याच्या तयारीत आहेत व खरेदी केलेले भुखंड विक्रीच्या तयारीत आहेत. त्यांना सदर दाव्यामध्ये प्रतिवादींच्या गटात गोवणे गरजेचे असल्याने त्यांना प्रतिवादीच्या गटात गोवण्यात आलेले आहे. असे दाव्यातील पॅरा क्रमांक ६ मध्ये वादी यांनी नमुद केले असल्याचे दिसुन येते.

**६.** उपरोक्त सर्व कारणांमुळे असे दिसुन येत आहे की, दाव्यास कारण वादी यांनी दाव्यात नमुद केले आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक ३ ते ७ यांचा दाव्यात समाविष्ठ करण्याचे कारण दाव्यातील पॅरा क्रमांक ६ मध्ये नमुद केले आहे. तसेच वादीने कोणता रिलीफ दाव्यात मागावा किंवा नाही हा दावा दाखल करणा—या वादीचा अधिकार आहे. करीता उपरोक्त सर्व कारणांमुळे असे दिसुन येते की, सदर अर्ज हा ऑर्डर ७ रुल ११ दिवाणी प्रक्रीया संहिताच्या तरतुदी अंतर्गत मंजुर करता येणार नाही. सदरचा दावा हा प्राथमिक स्टेजला असुन सदर दाव्यात अदयाप पुरावा झालेला नाही.

दोन्ही पक्षांना आपली बाजु मांडण्याची पुरेपुर संधी मिळणे आवश्यक आहे. तसेच दोन्ही पक्षांना दाव्यात पुरावा देण्याची पुरेपुर संधी आहे. त्यामुळे आत्ताच्या प्राथमीक स्टेजला सदरचा दावा ऑर्डर ७ रुल ११ दिवाणी प्रक्रीया संहीता तरतुदी प्रमाणे फेटाळणे न्यायोचीत होणार नाही. करीता उपरोक्त सर्व कारणांमुळे मी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

(१) अर्ज निशाणी क्र. २२ नामंजुर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/—

अंबड.
दि. ३०.०८.२०२१

( एम. एम. चौधरी )
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंबड.

**प्र मा ण प त्र**

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव — वाय. डी. वाघ, लघुलेखक (नि.श्रे.)

कार्यालयाचे नाव — तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबड

स्वाक्षरीत/—

लघुलेखकाची सही